- प्रेस नोट -

दि. ३१/१०/२०२६

ट्रॉम्बे पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि.३०/१०/२०२६ रोजी १०.०० वा. च्या सुमारास महिला फिर्यादी, वय-३४ वर्षे, धंदा- गृहिणी, रा.ठी. मानखुर्द, मुंबई येथे राहते घरी फिर्यादीचे पती अटक आरोपी पुरूष वय- ३३ वर्षे हे त्यांच्या मुलीस मारहाण करीत होते त्यावेळी फिर्यादी यांनी मारहान न करण्यास सांगितले असता त्याचा राग येवुन अटक आरोपीने फिर्यादींना जीवे मारण्याच्या उद्देशाने चाकुने वार केले व कमरेखालील भागावर चाकु मारून फिर्यादीला जखमी केले म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.३०/१०/२०२६ रोजी गु.र.क्र. ५९२/२६, कलम १०९(१), बीएनएस २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
